# राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य व वर्तमानातील संदर्भ

**प्रा. डॉ. निसर्गंध सिद्धार्थ** विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, सर सय्यद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

**गोषवारा :**

शिक्षण ही भविष्यातील राष्ट्रीय गुंतवणूक असून शिक्षण हे मानवी विकासाचे तंत्र आहे. या दूरदृष्टीचा वेध घेऊन राजर्षी शाहू महाराज शिक्षणाशी देशाचा व देशातील नागरिकांचा सकारात्मक सर्वसमावेशक विकास जोडतात. समाजाला शिक्षित करण्यासाठी महाराजांनी सक्तीचे व मोफत शिक्षण, वसतीगृह, शिक्षणावर वाढता खर्च, स्त्री शिक्षण, आरक्षण पद्धत यासारख्या धोरणाचा व योजनांचा वापर करुन शैक्षणिक विकास विषमता आधारित समाजात साधला. मात्र, आजच्या वर्तमान स्थितीत भारतातील शिक्षण व्यवस्था सामाजिक उपक्रमांतून खाजगी व्यवस्थेकडे संम्मीत झाली आहे होत आहे. शैक्षणिक विकासाच्या निर्देशांकावर ही गुणात्मक व संख्यात्मकदृष्ट्या कमकुवत आहे. या व्यवस्थेला बळकट करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विकासविषयक विचारांची व कृतीची गरज आहे.

**मुख्य शब्द** : शाहू महाराज, शिक्षण धोरण, योजना, वर्तमान शिक्षण पद्धती, समस्या, कृतीची गरज.

**SHAHU CHHATRAPATI, THE PILLAR OF SOCIAL DEMOCRACY**

My Dear Maharajasaheb,

We need you ever so much for you are the pillar of that great movement towards social democracy which is making its head way in India - Dr. B. R. Ambedkar

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजर्षी शाहू छत्रपतींना पत्र)

**प्रस्तावना :**

भारतीय समाज वर्ग, धर्म व जात यावर उभा आहे. तो पुरुषप्रधान संस्कृतीचा समर्थक आहे. भारतीय समाजव्यवस्थाच मुळात विषमता निर्माण करणारी आहे, विषमतेचे समर्थन करणारी आणि विषमतेला धर्म मान्यता देणारी आहे. ही व्यवस्था देवांशी, स्वर्गाशी, नरकाशी व पुनजर्न्माशी जोडली गेलेली आहे. त्यामुळे स्वाभाविकच तिच्याविरुद्ध बंड होण्यास कितीतरी वर्षे जावी लागली. ज्यांना या विषमतेची झळ बसते त्यांनी बंड करणे स्वाभाविक आहे. तसे बंड झालेही, परंतु जो राजा आहे, ज्याला या विषमतेची झळ बसण्याची शक्यता नाही अशी बंड केल्याचे क्वचीतच उदाहरण पाहावयास मिळते. महाराष्ट्रात मात्र करवीर संस्थानातील राजर्षी शाहू महाराजांनी प्रतिगामी व्यवस्थेविरुद्ध चौफेर बंड केले. परंपरागत रुढी, प्रथा, संस्कृतीच्या वरवंटयाखाली भरडल्या जाणाऱ्या समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि प्रतिष्ठा देण्यासाठी बंड केले. बंड करणारा, नवरचना करणारा महाराज म्हणून शाहूंचे नाव अजरामर आहे.

जगातील कोणत्याही राष्ट्राला जलद, गतीमान व शाश्वत विकास साधवयाचा असेल तर त्या राष्ट्राला शिक्षण क्षेत्राचा पर्याप्त विकास साधणे गरजेचे आहे. कारण, शिक्षण ही विकासाची पूर्व अट असून मानवी कल्याणाचे महत्वपूर्ण निर्देशक आहे. मुख्यतः याच महत्वाला जाणून राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांच्या संस्थानात शिक्षण क्षेत्राचा विकास करुन समाजातील सर्व स्तरातील मुला–मुलींना शिक्षण देण्याचे कार्य केले. विशेषतः त्या काळात स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. वर्तमान स्थितीत या विचारांची गरज महाराष्ट्रासह भारतालाही आहे.

**शाहू महाराजांच्या दृष्टितून शिक्षण : सर्वसमावेशक शिक्षण**

शाहू महाराज प्राथमिक शिक्षणाबाबत म्हणतात की, शिक्षण हेच आमचा तोरणापाय आहे, असे माझे मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो, अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उन्मत व लढवय्ये वीर कधीच निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळेच महाराजांनी सर्वसमावेशकपणे शिक्षणाचे महत्व सांगितले, ते खालील प्रमाणे –



उपरोक्त आकृतीवरुन राजर्षी शाहू महाराजांचे समाजातील सर्व स्तरावरील जनतेसाठी लोकाभिमुख सर्वसमावेशक शैक्षणिक धोरण किंवा योजना पाहवयास मिळतात. या योजनातून निश्चितपणे शैक्षणिक विकास झाला.

**मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा :**

आपल्या राज्यात प्रजेसाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करावे या विषयावर शाहू महाराज, 1912–13 सालापासून गांभीर्याने विचार करत होते. पुढे त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी वतनी शिक्षकासारखे काही अभिनव प्रयोगही केले. पण ते फार यशस्वी झाले नाहीत. 1917 मध्ये मात्र त्यांनी या संदर्भात निश्चित पाऊल उचलले. 24 जुलै रोजी महाराजांनी जाहीर केले, येत्या गणेश चतुर्थीपासून 30 सप्टेंबर करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील शुल्क सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रो. पंडितराव अशा तीन ब्राम्हण शिक्षणतज्ञांची समिती नेमली गेली. एज्युकेशन इन्स्पेक्टर डोंगरे यांच्याकडे अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपविली गेली. तसेच या सक्तीच्या शिक्षणावर 1 लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले गेले. त्यापैकी 80 हजार रुपये दरबार खजिन्यातून तर 20 हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. या रकमेतून खर्च होऊन शिल्लक उरणारी रक्कम, टेऊनिंग कॉलेज, शाळांच्या इमारती, शिक्षणोपयोगी साहित्य यावर खर्च होणार होती.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांचे जीवन व कार्याचे सखोल अभ्यासक, संशोधक डॉ. जयसिंगराव पवार आपल्या राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य या ग्रंथात नमूद करतात की, 21 सप्टेंबर 1917 रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा जाहीरनामा प्रसिद्ध झाला व त्याची अमलबजावणी होझन त्याचा परिपाक विद्यार्थी संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली.

1917–18 सालात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली. त्यावेळी या योजनेखाली 27 शाळा व 1296 मुले होती. पाच वर्षांच्या कालावधीत, 1921–22 सालापर्यंत त्यात वाढ होऊन शाळांची संख्या 420 व मुलांची संख्या 22,007 अशी झाली. 1922 सालापर्यंत या योजनेवर होणारा खर्च तीन लाखापर्यंत गेला. त्याचप्रमाणे महाराजांच्या राज्यरोहन प्रसंगी 1894 साली कॉलेजचे विद्यार्थी सोडून संस्थानातील एकूण विद्यार्थी संख्या 10844 इतकी होती. ती 1922 साली 27830 झाली. त्याचबरोबर अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या संख्येत अशा प्रकारे नऊ पटीहून अधिक वाढ झाल्याचे दिसून येते. कॉलेज विद्यार्थ्यांची संख्या 79 वरुन 265 झाली. त्यामध्ये 1894 साली या 79 विद्यार्थ्यांत ब्राम्हणेतर विद्यार्थी फक्त 6 होते आता 1922 साली 265 विद्यार्थ्यांपैकी ब्राम्हणेतर विद्यार्थ्यांची संख्या 100 झाली होती. त्याचप्रमाणे महाराजांनी प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, पुरोहित शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा, डोंबारी मुलांची शाळा व कला शाळा उघडून समाजातील सर्वांसाठी शिक्षणाची दारे उघडली.

**वसतिगृह : बहुआयामी पैलू :**

राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची उभारणी केली. त्यामध्ये 1. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाझस 2. दिगंबर जैन बोर्डिंग, 3. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह, 4. मुस्लिम बोर्डिंग, 5. मिस क्लार्क होस्टेल, 6. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, 7. श्री. नामदेव बोर्डिंग, 8. पांचाळ ब्राम्हण वसतिगृह, 9. इंडियन ख्रिश्चन होस्टेल, 10. ढोर–चांभार बोर्डिंग, 11. सुतार बोर्डिंग, 12. नाभिक विद्यार्थी वसतिगृह, 13. उदाजी मराठा वसतिगृह, 14. वंजारी समाज वसतिगृह, 15. चोखामेळा वसतिगृह इत्यादी वसतिगृहांची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास आर्थिक हातभार लावला.

शाहू महाराजांनी आपल्या हयातभर जातिभेद व अस्पृश्यता या दोन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अस्पृश्यता हे जातिभेदाचे विकृत स्वरुप असल्याचे त्यांनी अनेकदा जाहीर केले. असे असूनही, त्यांनी आपल्या राज्यात जातवार वसतिगृहे का काढावीत या प्रश्नाने अनेकांना संभ्रमित केले आहे. त्यामध्ये समाजशास्त्राचे गाढे अभ्यासकही आहेत. मात्र, जयसिंगराव पवार यांनी अतिशय सामाजिक विश्लेषण पद्धतीने या प्रश्नांचे उत्तर दिले आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा थोडया खोलात जावून विचार केला तर महाराजांची ही कृती त्या काळाला धरुनच होती असे दिसून येते. शेकडो वर्षे भक्कम पायावर उभी असलेली जातीव्यवस्थेची उतरंड महाराज काही एका रात्रीत उदध्वस्त करु शकत नव्हते. या व्यवस्थेचे वैशिष्टयच असे होते की, प्रत्येक वरची जात, खालच्या जातीस तुच्छ समजत होती, तसेच ती आपल्याच वर्तुळात फिरत राहून आपले स्वतंत्र अस्तित्व प्राणपणाने जपत होती. जर त्यावेळेला सर्वांसाठी एकच वसतिगृह असते तर समाजातील सर्व जातीचे मुले त्याठिकाणी शिकली नसती.

**स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन : समवृत्ती शिक्षण :**

म्हाराजांनी शिक्षणात स्त्री–पुरुष असा भेद केला नाही. मुलींनी अधिक शिकावे यासाठी महाराजांनी वेगवेगळे प्रयत्न केले. रखमाबाई केळवकर यांना स्त्री शिक्षण अधिकाऱ्याचे पद दिले व त्यांच्या मदतीने स्त्री शिक्षणास गती दिली. मुलींनीही मुलांप्रमाणे शिकावे यासाठी खास उत्तेजन दिले. एकूण 5 शिष्यवृत्त्या यासाठी त्यांनी सुरु केल्या. रखमाबाई केळवकर यांच्या मुलीस डॉ. कृष्णाबाईंना मुंबई व परदेशात उच्च शिक्षण घेण्यास पाठविले. तसेच 11 ऑक्टोबर 1919 रोजी जाहीरनामा काढून स्त्री शिक्षण लॉजींग बोर्डिंगसह मोफत केले. तसेच राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना उच्च शिक्षण मोफत केले.

स्त्री या व्यक्तीगत विकासासंबंधी त्यांची अत्यंत परखड भूमिका होती. त्यांच्या विधवा सुनेला इंदूमती देवींना शिक्षण देताना राजपरिवाराचा कडवा विरोध पत्करुन सोनतळी कॅम्पवर शिक्षण दिले. याबाबतीत डॉ. अरुण ढेरे म्हणतात की, ***एक कर्ता सुधारक राजा व प्रागतिक उदारमतवादी पुरुष म्हणून शाहू महाराजांचे हे वर्तन सदैव स्मरणात राहील.*** इंदूमती देवींचे आयुष्य म्हणजे शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षणविषयक कल्पना राबविण्याची एक प्रयोगशाळा होती.

**वर्तमान भारतातील शैक्षणिक स्थिती : वास्तविकता :**

सहा ते चौदा वयोगटातल्या सर्वांना मोफत आणि सक्तीचं शिक्षण देऊ करणारा 'शिक्षण हक्क कायदा' देशात लागू केल्यानंतर अनेक वर्षे होऊनही भारतात आज 42 टक्के मुलांना प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच शाळा सोडावी लागते. हेच गळतीचं प्रमाण अनुसूचीत जातींमध्ये 51.24 टक्के आणि अनुसूचीत जमातींमध्ये 57.58 टक्के आहे. असं 12th Five year Plan रू 2012.2017, Vol. 3, Social Sectors, Planning Commission, Govt. of India;k अहवालातील पृ. क्र 53 वर नमूद केले आहे. याशिवाय शिक्षणाचा दर्जा खूप खालावणं, शाळा आणि शिक्षक नसणं, शिक्षक असले तरी खऱ्या अर्थानं चांगल शिक्षण नसणं, शाळेत वीज, पाणी, प्रयोगशाळा, कॉम्प्युटर्स, प्रयोगाची उपकरणे– एवढेच नव्हे तर शौचालयही नसणं किंवा कमी प्रमाणात असणं अशा अनेक समस्या आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये आहेत.

सुप्रसिद्ध http://www.disc.in या संकेत स्थळाने प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार 2016–17 मध्ये आपल्या शाळांची काय परिस्थिती होती हे वाचून आपल्याला धक्काच बसेल. 40 टक्के शाळांना कुंपण, कंपांड नव्हते, 45 टक्के शाळांमध्ये हेडमास्तरांना वेगळी खोलीही नव्हती. 40 टक्के शाळांमध्ये वीज नव्हती, 18 टक्के शाळांमध्ये वाचनालय नव्हतं, 95 टक्के शाळांमध्ये ग्रंथपाल नव्हता, 40 टक्के शाळांमध्ये खेळण्यासाठी मैदान नव्हते, 72 टक्के शाळांमध्ये कॉम्प्युटर नव्हता, ज्यांच्याकडे होता अशा 28 पैकी 14 टक्के शाळांमधला कॉम्प्युटर चालतच नव्हता, फक्त 9.5 टक्के शाळांमध्ये इंटरनेट कनेक्शन होत. 13 टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्यवस्थीत नव्हती. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि कॉम्प्युटर यांच्याविषयीच्या प्रयोगशाळा 70–72 टक्के शाळांमध्ये नव्हत्या. खेडयातल्या 50 टक्के शाळांमध्ये आणि शहरातल्या 33 टक्के शाळांमध्ये एकूण सरासरी 47 टक्के शाळांमध्ये शौचालय किंवा वॉशबेसीन यांची तरतूद नव्हती. आणि 44 टक्के शाळांमध्ये मुलींकरीता वेगळ टॉयलेट नव्हत. एवढ असून शिक्षणाचा दर्जा काय होता तर 5वीतल्या 52 टक्के मुलांना दुसरीसाठीच पाठयपुस्तक वाचताही येत नव्हतं आणि 49 टक्के मुलांना दोन अंकांची वजाबाकी जी दुसरीत करायला शिकवतात तीही करता येत नव्हती. यावरुन एकूणच भारतातील शिक्षणाची वास्तविकता सुस्पष्ट होते.

**शिक्षण मध्येच का सोडतात : कारणमीमांसा :**

सन 2019 मध्ये भारतात 26 टक्के लोक अजून अशिक्षित आहेत. पण 74 टक्के सुशिक्षित लोकांमध्येही प्राथमिक शाळा सोडलेली 23 टक्के मुल आहेत. 2015 च्या अधिकृत आकडेवारीप्रमाणे प्राथमिक शाळा 5वीपर्यंत पोहचलेली 25.2 टक्के, 10 वी पर्यंत पोहोचलेली 11.1 टक्के, 12 वी पर्यंत पोहोचलेली 8.6 टक्के आणि पदवी मिळवलेली 4.5 टक्के आहेत. आज हे प्रमाण थोडस वाढल असल तरीही परिस्थितीत आमूलाग्र बदललेली नाहिये. अस 7 नोव्हेंबर 2015 च्या प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियात जाहीर केल होत. एका अहवालात मुल आपल शिक्षण मध्येच का सोडतात, त्याच्या कारणांची वर्गवारी केली होती. त्यात 21 टक्के हे आर्थिक अडचणींमुळे( आर्थिक)] 14 टक्के पालकांनी पाल्याच्या शिक्षणात रस न दाखवल्यामुळे(संस्कृती)] 14 टक्के मुलांना स्वतःच्या शिक्षणात रस नसल्यामुळे (संस्कृती), आणि 8 टक्के मुलांना शिक्षण न झेपल्यामुळे (क्षमता) अशी कारणे दिली होती.

**शिक्षणावरील खर्च : सत्यशोध :**

भारत सरकारनं शिक्षणावर अनेक वर्षे दरवर्षी जीडीपीच्या कमीत कमी 6 टक्के खर्च केला पाहिजे, अस नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांच्यासारखे अनेक तज्ञ म्हणतात. 1966 मध्ये कोठारी कमिशनने हेच सुचवलेले होते. जर वयाच्या 22 व्या वर्षापर्यंत सर्वांत मोफत आणि दर्जेदार शिक्षण द्यायच असेल तर खरतर यापेक्षाही जास्त ;जीडीपीच्या 7–8 टक्केद्व खर्च करावे लागतील. 2012–13 मध्ये आपण शिक्षणावर जीडीपीच्या फक्त 3.1 टक्के खर्च करत होतो. ते प्रमाण 2017–18 मध्ये 2.7 टक्के वर घसरलय, अस 31 जानेवारी 2017 चा आर्थिक सर्वेक्षण सांगतो, त्यातून भ्रष्टाचार विचारात घेतला तर प्रत्यक्ष लोकांपर्यंत जीडीपीच्या जेमतेम 1–1.5 टक्के एवढीच रक्कम पोहोचत असेल इतर विकसित आणि विकसनशील देश आणि ब्रिक्समधले देश भारतापेक्षा या बाबतीत जीडीपीच्या खूपच जास्त टक्केवारी शिक्षणावर खर्च करतात. उदा. हीच शिक्षणावर खर्च केलेली जीडीपीची टक्केवारी ब्राझीलमध्ये 5.8 टक्के, दक्षिण आफ्रिकेत 6 टक्के, अमेरिकेत 5.4 टक्के आणि यु.के.मध्ये 6.2 टक्के अशी आहे. म्हणजेच भारताच्या जवळजवळ दुप्पट हेच आकडे दरडोई काढले तर भारतापेक्षा इतर देशांचे अनेक पट होतील.

**शिक्षणाचे व्यापारीकरण : गत व वर्तमान स्थिती :**

राजर्षी शाहू महाराजांनी सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करुन मानवी विकासासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न केले. शिक्षण हे समाज कल्याणाचे तंत्र समजून मोफत शिक्षण दिले. मात्र, आज शिक्षण क्षेत्र म्हणजे एक मोठा उद्योगच झाला आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाची प्रक्रिया 1990 च्या दशकातच सुरु झाली असली तरी 2000–01 च्या नंतर खाजगी महाविद्यालय प्रचंड मोठया प्रमाणावर वाढली आणि मोठमोठे शिक्षण सम्राट तयार झाले. पण या शिक्षणसंस्था महागडया असल्यामुळे त्या फक्त मध्यम, उच्च मध्यम वर्गाला किंवा श्रीमंतानाच परवडण्यासारख्या आहेत. इथे काळया पैशांचा मोठया प्रमाणात व्यवहार होत असतो. या शिक्षण संस्थेचे बडया उद्योगपतींशी आणि राजकारण्यांशी खूपच जवळचे संबंध असतात. कित्येक शिक्षणसंस्था थेट राजकारण्यांनीच चालवलेल्या आहेत. या संस्थांमध्ये डोनेशन किंवा कॉर्पोरेट फीच्या नावाखाली विद्यार्थी, पालक यांच्याकडून प्रचंड काळा पैसा यात उकळला जातो.

प्री–प्रायमरी ग्रुपपासून पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत भारताच्या फक्त मध्यमवर्ग, उच्च मध्यम वर्ग आणि श्रीमंत वर्ग म्हणजे एकूण लोकसंख्येच्या फक्त 15–20 टक्के यांनी सरकारी शाळा, कॉलेजमधून शिक्षण न घेता डोनेशन–कॉर्पोरेट फी भरुन खाजगी शिक्षण संस्थांमधूनच शिक्षण घेतल, वर सगळयांची मिळून ही डोनेशन कॉर्पोरेट फीच्या स्वरुपात भरलेली रक्कम 36400 कोटी रु. एवढी होते,

हे एका आकडेवारीवरुन रमेश गोयल आणि अंकुर गोयल यांनी 'एज्युकेशन सेक्टर्स लिंक टू ब्लॅक मनी' या आपल्या 26 जून 2014 रोजी लिहिलेल्या लेखात मांडले होत. ही रक्कम भारतीय जीडीपीच्या 0.6 टक्के आहे आणि भारतीय सरकारच एचआरडी मंत्रालय एका वर्षात जेवढा खर्च करत त्याच्या 55 टक्के आहे.

**निष्कर्ष :**

1. स्वातंत्र्यापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानांतर्गत सर्वांसाठी शिक्षण सक्तीचे केले. मात्र, स्वतंत्र भारतात सदरील योजना चालू होण्यासाठी सहा दशकांचा कालावधी लागला. (1947 ते 2009).
2. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण सक्तीचे केले परंतु त्यासोबत प्राथमिक ते उच्च शिक्षण मोफत दिले. मात्र, वर्तमान स्थितीत 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी सदरील सुविधा आहे परंतु त्यातही मोठया प्रमाणात त्रुटी व अंमलबजावणीत उदासीनता आढळून येते.
3. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणास केंद्रस्थानी ठेऊन त्यावर मोठया प्रमाणात खर्च केला. पाच वर्षातील खर्च त्या काळात तीन लक्षाच्या वरती गेला. परंतु वर्तमानस्थितीत शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या तुलनेत सरासरी 1 ते 2 टक्क्यांच्या आसपास आहे.
4. राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन काळात सामाजिक पायाभूत सुविधांचा विकास केला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे विविध शाळा व वसतिगृह होय. मात्र वर्तमानस्थितीत शिक्षणविषयक पायाभूत सुविधा पर्याप्त प्रमाणात दिसून येत नाहीत. आजच्या शैक्षणिक पायाभूत सुविधा गुणात्मक व संख्यात्मक निकषावर अपुऱ्या आहेत.
5. राजर्षी शाहू महाराजांनी समवृत्ती शिक्षण प्रणाली धोरण राबवून महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडली व त्यांना शिक्षित केले. मात्र, आजही मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण वाढले आहे. काही मुली शाळेचे तोंडही पाहू शकत नाहीत. ही वास्तविकता भारतासहीत महाराष्ट्रातही दिसून येते.
6. शाहू महाराजांनी समाजातील आर्थिक स्थितीचा व कल्याणकारी राज्याची भूमिका या नात्याने सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले. परंतु वर्तमान स्थितीत गुणवत्तेच्या नावावर शिक्षणाचे खाजगीकरण झाले आहे. सिमांत वर्गातील व्यक्तीही त्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकविण्यासाठी भरमसाठ डोनेशन ओढून ताणून भरत आहेत. शासनाचाही या खाजगीकरणास समर्थन आहेत्र मात्र, त्याचे गुणात्मक उत्पादन किती होईल याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

**वर्तमान शिक्षण व्यवस्थेसाठी उपाययोजना :**

1. केजी. ते पी.जी. पर्यंतचे शिक्षण सर्वांना मोफत मिळावे.
2. शिक्षणावरील खर्च जी.डी.पी.च्या सहा टक्के करावा.
3. शिक्षणाचे खाजगीकरण थांबविणे गरजेचे आहे.
4. शिक्षणविषयक पायाभूत सुविधांचा विकास पर्याप्त प्रमाणात करावा.
5. खाजगी इंग्रजी शाळांवर शासनाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे.
6. शासकीय शाळा, वसतिशाळा, आश्रमशाळा, रात्रशाळा यावर शासनाने पटनोंदणीच्या आधारावर बंदी आणू नये.

**सारांश :**

राजर्षी शाहू महाराजांनी राबविलेल्या शैक्षणिक योजनांचा परिणाम दूरगामी व विकासाधिष्ठित होता. त्यामुळे वर्तमान स्थितीतील शासनाने सदरील शिक्षण प्रणालीचे कायापालट करण्यासाठी शाहू महाराजांच्या शैक्षणिक नीतीचा वापर करावा. त्यामध्ये प्रामुख्याने 'सक्तीचे व मोफत शिक्षण धोरण' पदव्युत्तर स्तरापर्यंत वापरावे.

**संदर्भ :**

1. जयसिंगराव पवार (2012), राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
2. आर. एन. करपे (2012), राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
3. पी.बी. साळुके (2013), शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
4. भगत रा. सू. (2013), राजर्षी शाहू छत्रपती जीवन शिक्षण, सिद्धराज प्रकाशन, पुणे.
5. गायकवाड प्रदीप (2011), शाहू महाराजांची भाषणे आणि आज्ञापत्रे, क्षितिज प्रकाशन, कोल्हापूर.
6. उत्तम कांबळे (2003), राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन, पुणे.
7. अच्युत गोडबोले (2019), अनर्थ – विकासनीती : सर्वनाशांच्या उंबरठयावर, मनोविकास प्रकाशन, पुणे.
8. भारत सरकार (2013), 12 वी पंचवार्षिक योजना : 2012–17, खंड–3, सामाजिक क्षेत्र, नियोजन आयोग, दिल्ली.

9- http://www.disc.in

10- Press trust of India (2015) education cause, New Delhi.

11- Ramesh Goyan, Ankur Goyal (2014), Education Sectors link to black money, New Delhi.